
## चिंतन



डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: ‘पूर्वा कृषिदूत’)

# पीक लागवडीचे नियोजन विचारपूर्वक व्हावे!

- **शिल्लक ऊस मे पूर्वीच कारखान्यांकडे पाठवायला हवा होता**
- **गाळपाअभावी टनावारी ऊस शेतात अद्यापही आहे उभा**
- **कांदा लागवडीत मजुरांना महत्त्व; मजुरीचे दरही न परवडणारे**
- **कांद्याला मिळणारा भाव म्हणजे तोट्याची लाजिरवाणी आकडेमोड**
- **ऊस लागवड वाढली; मात्र वाढीव ऊसाचे नियोजन झाले नाही**
- **हरितक्रांतीच्या यशात तेलबिया पिके आणि कडधान्ये दुर्लक्षित**

अलीकडे राज्यात सर्वत्र शेतकऱ्यांचा आक्रोश ऐकायला मिळतो. महाराष्ट्र हे कृषिक्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. येथील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्यात अग्रेसर आहेत. सरकारने इच्छा व्यक्त करावी आणि शेतकऱ्यांनी अपेक्षेपेक्षा उत्कृष्ट परिणाम दाखवावेत, हे सन २०१७ च्या हंगामातील तुरीच्या प्रचंड उत्पादनाने सिद्ध केले आहे. आज मात्र अनेक टन ऊस गाळपाअभावी शेतात उभा आहे. अनेक कारखाने मे च्या सुरवातीलाच बंद झालेत. त्यांच्याकडे हा शिल्लक ऊस नियोजनपूर्वक पाठवता आला असता. कांदा त्याच्या गुणाप्रमाणेच कधी हसवतो तर कधी रडवत असतो. या हंगामात हरभऱ्याचं पीक खूप चांगलं आलं. मात्र त्याच्या विक्रीचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणतं पीक किती क्षेत्रावर घ्यावं याचं नियोजन होणं गरजेचं आहे.

### कांद्याचा प्रश्न

आज शेतकऱ्यांचा कांदा कवडीमोल भावाने विक्री होत आहे. सुदैवाने ३-४ वर्षांपासून पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. शेती उद्योगात सर्वात मोठा प्रश्न मजुरांचा आहे. कांदा लागवडीत तर मजुरांना विशेष महत्त्व आहे. पिकाची लागवड, खुरपणी आणि काढणी- साठवण या महत्त्वाच्या कामांसाठी मजुरांवर शेतकऱ्यांना प्रचंड खर्च करावा लागतो. मजुरांची कार्यक्षमता व त्यांची काम करण्याची पद्धत याबद्दल विचार केला तर वेड लागण्याची वेळ येते. मजुरीचे दर तर आकाशाला भिडले आहेत. कांद्याला क्विंटलला १००० रुपये भाव मिळाला तर उत्पादन खर्चाची तोंडमिळवणी होऊ शकते. शेतकऱ्याला नफा मिळवण्यासाठी जास्त भाव मिळणे गरजेचे आहे. सध्याचे भाव ऐकले तर लाज वाटते!

उन्हाळी कांदा साठवणीत ठेवता येतो. शासनाने कांदा साठवण्याकरिता अनेक शेतकऱ्यांना चाळी बांधण्यासाठी पैसा उपलब्ध करून दिला. काही शेतकऱ्यांनी कांदा साठवणीचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक

| काही अधिक... | काही उणे... |
|---|---|
| शासकीय आवाहनाला प्रतिसाद देऊन; उत्तम नियोजन करून शेतकऱ्यांनी २०१७ च्या हंगामात घेतले होते तूर पिकाचे विक्रमी उत्पादन | एकेकाळी सहकारी साखर कारखान्यांनी आपापल्या कार्यक्षेत्राला सोन्याचे दिवस दाखवले; परंतु काहींच्या 'स्वाहाकारा'मुळे पुन्हा दुर्दशा वाट्याला आली |
| उन्हाळ कांदा साठवणुकीसाठी चाळी बांधायला शासनाने अर्थसाह्य दिले; काही शेतकऱ्यांनी स्वखर्चानेही बांधून घेतल्या आहेत चाळी | हाती आलेल्या पिकांसाठी बाजारपेठेची तजवीज ठरते आवश्यक; मात्र शासकीय स्तरावर ही बाब गांभीर्याने घेतली जात नाही |
| चांगल्या परताव्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस लागवडीला पसंती दिली; साखर कारखान्यांमुळे कार्यक्षेत्रातल्या परिसराची भरभराटही झाली | आयात पामतेलाच्या भेसळीचे पाप आजही आपल्याकडून घडते आहे; शासनाचे 'तेलबिया मिशन'चे घोषणापत्र केवळ कागदावरच उरले आहे |

वर्षांपूर्वीच चाळी स्वखर्चाने बांधल्या आहेत. ३०-४० वर्षांपूर्वी कांद्याची लागवड राज्यात नाशिक, पुणे, जळगाव व अलिबाग या जिल्ह्यांपुरतीच मर्यादित होती. नाशिक जिल्ह्यात निफाड, चांदवड, दिंडोरी, नाशिक व येवला या तालुक्यांतच कांदा लागवड केली जायची. हा 'नाशिकचा कांदा' जगात प्रसिद्ध होता. पुण्यामध्ये 'फुरसुंगी कांदा' घेतला जायचा. जळगाव व अलिबागमध्ये पांढरा कांदा घेतला जायचा. पुढे कांद्याला प्रचंड मागणी वाढली. निर्यात वाढली. भावही आकर्षक मिळू लागले. त्यामुळे जेथे कांद्याची लागवड होत नव्हती तेथेही कांदा लागवड सुरू झाली. द्राक्षे व डाळिंब या पिकांप्रमाणेच कांदा हे प्रमुख नगदी पीक बनले. पूर्व विदर्भ व कोकण वगळता सर्वत्र कांदा लागवड सुरू झाली. या पिकापासून चांगला परतावा मिळत असल्यामुळे व चार महिन्यात पीक तयार होत असल्यामुळे त्याच्या उत्पादनात खूप वाढ झाली. आखाती देशांमधून आपल्या कांद्याला प्रचंड मागणी आहे. कांदा निर्यात धोरणात अनेक वेळा बदल झालेत. कांद्याखालील क्षेत्रात वाढ होत आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट असताना, त्याच्या खरेदी- विक्रीचे नियोजन आधीच तयार असले पाहिजे.

### ऊसाचीही अतिरिक्त लागवड

गेल्या ४ वर्षांपासून भूपृष्ठावरील व भूगर्भातील पाण्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे ऊसाची लागवडही वाढली आहे. त्यामागे निश्चित हमीभाव मिळणे, श्रम-मेहनत कमी लागणे, विक्रीचा प्रश्न नसणे, जास्तीचे पीककर्ज उपलब्ध होणे, एका लागवडीनंतर तीन वर्षांसाठी लागवडीच्या खर्चात बचत होणे, मजूर टंचाईवर मात करता येणे आदी कारणे आहेत. खरे तर साखर कारखाने हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान आहेत. कारखाने ऊसाची लागवड वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतात. ऊसापासून शेतकऱ्यांना सर्वात जास्त परतावा मिळतो. परिसरात रोजगार निर्मिती वाढते. कार्यक्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा होते. शिक्षणसंस्था निर्माण होऊन त्यांची भरभराट होते. एकूणच कारखाना परिसर समृद्ध होतो. यासाठी चेअरमन व संचालक मंडळ प्रामाणिक आणि

दूरदृष्टीचे असणे आवश्यक असते. निफाड, नाशिक, रानवड, दाभाडी व साक्री येथील कारखाने अतिशय भरभराटीला आलेले आम्ही बघितले होते. शेतकरी वर्ग संपन्न झाला होता. नोकरवर्ग आनंदी होता. दुर्दैवाने काळ बदलला. भ्रष्ट कारभार सुरू झाला. चालकांचे उखळ पांढरे झाले आणि हे प्रगतिपथावरील कारखाने उद्ध्वस्त झाले. सहकाराची ही मोठी शोकांतिका आहे.

पश्चिम महाराष्ट्र हा 'शुगर बेल्ट' म्हणून ओळखला जातो. यातील अनेक सहकारी साखर कारखाने नावारुपाला आलेले आहेत. पारंपरिक दुष्काळी आणि कोरडवाहू मराठवाड्यातही मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड आणि साखर कारखान्यांची संख्या वाढली आहे. सन २०१२-१३ च्या दुष्काळामुळे पाणी प्रकल्प कोरडे पडून बीड, उस्मानाबाद, लातूर, जालना व औरंगाबाद जिल्ह्यांमध्ये ऊसाखालील क्षेत्र कमी झालं. सन २०१९ पर्यंत ही परिस्थिती होती. २०१९ ते २०२१ या कालावधीत पाण्याची उपलब्धता वाढून ऊस लागवडीखालील क्षेत्रातही वाढ झाली. ऊसाला ज्या पद्धतीने मोकाट पाणी दिले जाते, त्यामुळे ऊस हे जास्त पाणी पिणारे पीक म्हणून ओळखले जाते. वास्तविक हा गैरसमज आहे. ऊसाला एवढ्या पाण्याची गरजच नसते. त्यामुळे शासनाने ऊसाची लागवड ठिबक सिंचनावर आणि सुधारित तंत्रावर करावी, असा आग्रह धरलेला आहे. परंतु त्याचा उपयोग फार मोजके शेतकरी करताना दिसतात.

ऊसाच्या उत्पादनात गेल्या दोन दशकांत प्रचंड वाढ झाली आहे. सन २०००-०१ मध्ये ४ कोटी ९६ लाख मे. टन, सन २०१०-११ मध्ये ८ कोटी ५७ लाख मे. टन आणि २०२०-२१ मध्ये ११ कोटी १६ लाख मे. टन ऊसाचे उत्पादन होते. सन २०२०-२१ मध्ये ११ लाख ४३ हजार हेक्टरवर लागवड झाली तर २०२१-२२ मध्ये १२ लाख ३२ हजार हेक्टरवर झाली. या व्यतिरिक्त बिगर नोंदणीचे क्षेत्र बरेच असू शकते. अशा प्रकारे लागवडीचे क्षेत्र व उत्पादनात झालेली वाढ दिसून आली असताना, वाढीव ऊसाच्या व्यवस्थापनाबद्दल विचार करणे आवश्यक होते. तसे नियोजन न केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी रस्त्यावर येऊन आंदोलन करीत आहेत. सन २०१० मध्ये पहिले ऊस हार्वेस्टर मशिन इंदापूर तालुक्यात आले. आता सध्या ९०० हार्वेस्टर मशिन कार्यरत आहेत. हार्वेस्टर रोज २०० टन ऊसाची काढणी करते. मजूर केवळ २ टन ऊसाची काढणी करतात. ३६% मजूर बीड जिल्ह्यातून कर्नाटकमध्ये जातात. धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यातील मजूर गुजरातमध्ये ऊस तोडणीसाठी जातात. कर्नाटकातील हंगाम मार्चअखेर संपतो. या परतलेल्या मजुरांचा उपयोग आपल्या राज्यात करून घेता आला असता.

## गळीतधान्ये आणि कडधान्ये दुर्लक्षित

सन १९६५ ते १९७१ च्या दरम्यान देशात हरितक्रांती घडून आली. त्यामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला. परंतु गळीतधान्ये व कडधान्याच्या बाबतीत विशेष बदल घडला नाही. सन १९८५ मध्ये देशात 'तेलबिया मिशन' ची स्थापना झाली. तरीही आपण कोट्यवधी रुपयांच्या तेलाची व डाळींची आयात करीत आहोत. इंडोनेशिया व मलेशिया या दोन देशांतून पामतेलाची आयात केली जाते. या निकृष्ट दर्जाच्या तेलाचा वापर भेसळीसाठी केला जातो. रशिया आणि युक्रेन या देशांतून आपण सूर्यफुलाच्या तेलाची आयात करतो. आता या दोन देशांमध्ये युद्ध सुरू आहे. त्यामुळे या देशांतून तेलाची आयात बंद होणार आहे. अशा परिस्थितीत शासनाने तेलबिया व डाळवर्गीय पिकांचा लागवडीला प्रोत्साहन दिले पाहिजे. स्थानिक पातळीवर या पिकांच्या उत्पादनावर प्रक्रिया उद्योग सुरू करून; ऊसाप्रमाणे उत्पन्नाचा परतावा आणि हमीभावाचे कवच देण्याचे प्रयत्न शासनाने करायला हवेत. तसे न झाल्यामुळे तेलबिया व डाळवर्गीय पिकांमधील अनिश्चितता शेतकरी अनुभवीत आहेत. ऊस लागवडीसाठी साखर कारखाने गावोगाव प्रोत्साहन देतात व ऊस लागवडीकडे शेतकऱ्यांचे मन वळवले जाते. तसा प्रयत्न या पिकांसाठी कृषी विभागातर्फे होण्याची गरज आहे.

सारासार विचार करून पिकांच्या लागवडीचे आणि येणाऱ्या उत्पादनाचे योग्य ते नियोजन केल्यास, देशाच्या व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होईल असे वाटते.

■